सहकारी अधिकारी-(प्रथम श्रेणी), सहकारी संस्था, मोखाडा तालुका,जिल्हा-पालघर

(अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विक्रमगड तालुका, जिल्हा- पालघर).

यांचे कार्यालय.

पोस्ट ऑफीस जवळ, मेन रोड, मोखाडा, जिल्हा- पालघर.


---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१)(दोन) अंतर्गत आदेश.

जा. क्र. सअ-(प्रश्रे)/जव्हार/क. ७७ (अ)/ १५ /सन २०१७
मोखाडा, जिल्हा- पालघर, दि.- २२ - २ - २०१७

वाचावे- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) (दोन) मधील तरतूद.
२) निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडील दि.- ४-२-२०१७ रोजीचा अहवाल.
३) संस्थेचे सचिव यांचेकडील दि.- १८-२-२०१७ रोजीचे पत्र.

ज्याअर्थी वाकडपाडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., वाकडपाडा, तालुका- मोखाडा, जिल्हा- पालघर (यापुढे संस्था असे वाचावे), ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अंतर्गत नोंदणी क्रमांक-टीएनए/ एमकेए/ आरएसआर/(एसआर)/६०३/सन १९९०, दि.- ३१-८-१९९० अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असून, ती या कार्यालयाच्या अखत्यारीत येते आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे) व त्याखालील नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे) तसेच संस्थेचे नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेली परिपत्रके यानुसार चालविले जाणे आवश्यक आहे आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणूक घेणेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि.- १७-१-२०१७ ते ५-३-२०१७ या कालावधीत निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द केला होता. परंतु सदर संस्थेच्या एकाही सभासदाने उमेदवारी अर्ज दाखल न केल्यामुळे व्यवस्थापक समिती गठीत होऊ शकली नाही. याबाबतचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि.-४-२-२०१७ रोजी संस्थेचे सचिव यांचेकडे सादर केलेला आहे. त्यास अनुसरुन खरीप हंगाम २०१७ करीता कर्जवाटपास अडचणी येऊ नयेत तसेच नवीन समिती गठीत होईपर्यंत दैनंदिन कामकाज करण्याकरीता सद्या कार्यरत असलेले प्राधिकृत अधिकारी श्री. हरेश महाले, शाखा निरिक्षक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., खोडाळा शाखा यांची नियुक्ती करणेबाबत संस्थेचे सचिव यांनी त्यांचेकडील दि.- १८-२-२०१७ रोजीच्या पत्राने विनंती केलेली आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेचे संपूर्ण कामकाज ठप्प होऊन व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झालेली आहे.

त्याअर्थी संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी तात्काळ समिती / प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१)(दोन) नुसार कारणे दाखवा नोटीस देण्याची आवश्यकता नाही अशी माझी खात्री झालेली असल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

## -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) (दोन) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी अनिल देवकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विक्रमगड तालुका, जिल्हा- पालघर, वाकडपाडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., वाकडपाडा, तालुका- मोखाडा, जिल्हा- पालघर या संस्थेचे सचिव यांनी केलेल्या विनंतीनुसार सद्या कार्यरत असलेले प्राधिकृत अधिकारी श्री. हरेश महाले, शाखा निरिक्षक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., खोडाळा शाखा यांची नियुक्ती संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी पुढे चालू ठेवत आहे..

नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी सहा महिन्यात नवीन समितीची निवडणूक घेऊन नवीन समितीने पदभार घेण्याचे दृष्टीने आवश्यक व्यवस्था करावी.

सदरचा आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) (दोन) अन्वये आज दि.- २२/२/२०१७ रोजी माझी स्वाक्षरी व शासन मुद्रेसह निर्गमीत केला असे.

(अनिल देवकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, विक्रमगड तालुका,
जिल्हा- पालघर.

प्रति,

१. सचिव, वाकडपाडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था म., वाकडपाडा, तालुका- मोखाडा, जिल्हा- पालघर.

२. प्राधिकृत अधिकारी श्री. हरेश महाले, शाखा निरिक्षक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., खोडाळा शाखा, तालुका-मोखाडा,
जिल्हा- पालघर.

३. शाखाधिकारी, दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., खोडाळा शाखा, जिल्हा- पालघर.

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदर संस्थेचे बँक खाते तात्काळ प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या नावे वर्ग करण्यात यावे.

प्रत- मा. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पालघर यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, विक्रमगड तालुका,
जिल्हा- पालघर.

Scanned by CamScanner